# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


## विशेष वार्तापत्र

जा.क्र. /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ०१/०८/२०१८

## "दारूबंदी जिल्हा चंद्रपुर कडे होणारी अवैध देशी दारूची तस्करी करणारे वाहन पकडले"

## जिल्हा रेड पथकाची कारवाही

**भंडारा:–** दिनांक ३१/७/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू यांना मिळालेल्या माहीतीच्या आधारे पवनी निलज रोडवर नाकाबंदी करून अवैध दारूची तस्करी करणारे वाहन क्रमांक एमएच २०/बीसी ३०१२ टवेरा वाहन ज्यामध्ये ७० खरडयाचे डब्यामध्ये देशी दारूच्या शिश्या भरलेल्या किमंती १,८२,०००/–रू चा माल मिळुन आला. हि कार्यवाही जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे रेड पथकातील अधिकारी, कर्मचा–यांनी पार पाडली.

याबाबत माहीती अशी की, दिनांक ३१/७/२०१८ चे रात्र दरम्यान भंडारा जिल्हयातुन दारूबंदी असलेल्या शेजारच्या चंद्रपुर जिल्हयात देशी दारूची अवैध वाहतुक होणार असल्याची माहीती जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांना मिळाली त्यांनी लगेच योग्य सुचना देवुन पवनी निलज रोडवर नाकाबंदी करण्याचे आदेश दिले पवनी निलज रोडवर नाकाबंदी दरम्यान वाहन क्रमांक एमएच २०/बीसी ३०१२ यास थांबवुन वाहनाची झडती घेत असता वाहनाचा चालक, वाहन सोडुन जंगलात अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये कागदी खरडयाचे ९० मिली च्या ७० देशी दारूच्या पेटया किमंती एकुण १,८२,०००/–रू मिळुन आल्या पोलीस स्टेशन पवनी येथे वाहन चालक मालक यांचेविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५ अ अन्वये गुन्हा नोंद करून गुन्हयात ७० देशी दारूच्या पेटया किमंती एकुण १,८२,०००/–रू व दारू तस्करी करणारे टवेरा चारचाकी वाहन किमंती ३,५०,०००/–रू असा एकुण ५,३२,०००/– रू चा माल गुन्हयात जप्त करण्यात आला.

हि कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक . जितेद्रं आडोळे, सफौ. अश्विनकुमार मेहर, पोहवा. रूपचंद जांगळे, पोना.प्रदिप डाहारे, पोशि.विनोद शिवणकर, चापोशि.सचिन गाढवे, मपोशि.तेजश्विनी लिल्हारे, मपोशि.सुनिता शेंदरे, यांनी पार पाडली.

"जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कडुन जिल्हयातील सर्व नागीकांना अवैध धंदे समुळ नष्ठ करून गावात शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करण्याकरीता पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे."

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.